| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**<br>**अमरावती विभागीय मंडळ अमरावती.**<br>MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION | |

पत्र क्रं अविमं/माप/312

दि 13/०५/२०२६

**प्रति,**

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती

**विषय** :- जुन-जुलै २०२६ मध्ये आयोजीत करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत.

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-६/२०१४,दि.१२/०५/२०२६ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, जुन-जुलै २०२६ मध्ये आयोजीत करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र,वृत्तवाहिन्या व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

आपली विश्वासू

(प्रिया देशमुख)
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र** :- प्रकटन

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२) मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग,अमरावती.
३) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.
४) मुख्याध्यापक/प्राचार्य,सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविदयालय, अमरावती विभाग अमरावती

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

**विषय– जून–जुलै २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत**

## ।। प्र क ट न ।।

---

जून–जुलै २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशिल | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा कालावधी (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते बुधवार, दि. ०८ जुलै, २०२६ | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |
| २. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते बुधवार, दि. ०८ जुलै, २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) | मंगळवार, दि. १६ जून, २०२६ ते मंगळवार, दि. ३० जून, २०२६ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि. १२/०५/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच सोशल मिडीया किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०५/२०२६

Mali

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.